सकाळ
कोल्हापूर शनिवार, ३ ऑक्टोबर २०१५



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील गांधी अभ्यास केंद्र व ग्रंथालयातर्फे शुक्रवारी महात्मा गांधी जयंतीनिमित्त आयोजित प्रदर्शनाची पाहणी करताना बीसीयुडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. भारती पाटील, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत.

# 'दक्षिण आफ्रिकेतील गांधी' प्रदर्शनाचे उद्घाटन

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २ : 'दक्षिण आफ्रिकेतील गांधी' या दुर्मिळ छायाचित्र व ग्रंथ प्रदर्शनाच्या माध्यमातून मोहनदास करमचंद गांधी या व्यक्तिमत्त्वाचा महात्मा गांधी होण्यापर्यंतच्या प्रवासाचा वेध घेता येऊ शकतो, असे मत शिवाजी विद्यापीठाचे बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी आज येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या नूतन इमारतीतील आबालाल रेहमान आर्ट गॅलरीमध्ये गांधी अभ्यास केंद्र व ग्रंथालय यांच्यातर्फे आयोजित 'गांधी इन साऊथ आफ्रिका' या छायाचित्र व ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

प्रदर्शनात महात्मा गांधी यांची दक्षिण आफ्रिकेमधील वास्तव्या दरम्यानची सुमारे तीस अत्यंत दुर्मिळ छायाचित्रे त्यांच्या माहितीसह प्रदर्शनात मांडली आहेत. ग्रंथालयातील महात्मा गांधी यांच्यासंदर्भातील सुमारे शंभर निवडक ग्रंथही प्रदर्शनात ठेवले आहेत. येत्या ९ ऑक्टोबरपर्यंत सकाळी साडेदहा ते सायंकाळी सहा या कालावधीत प्रदर्शन सुरू राहील. प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. भारती पाटील व डॉ. नमिता खोत यांनी केले आहे.

उद्घाटन प्रसंगी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. डी. व्ही. मुळे, डॉ. आर.बी. पाटील, उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार उपस्थित होते.